**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
शासन निर्णय क्रमांक – सेंनिवे 1098/45/सेवा–4,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 29 मे 1998.

## शासन निर्णय

पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाच्या निर्णयाच्या अनुरोधाने, शासन असे आदेश देत आहे की,

(अ) अन्यथा विनिर्दिष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीज करुन, ज्यांचे सध्याचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षे आहे असा प्रत्येक शासकीय कर्मचारी आता ज्या महिन्यात 60 वर्षे वयाचा होईल त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवेतून निवृत्त होईल. तथापि, ज्या शासकीय कर्मचा–याची जन्मतारीख महिन्याच्या एक तारखेला असेल तो कर्मचारी 60 वर्षे वयाचा होताच, मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत्त होईल.

(ब) नियतवयमानाच्या वयानंतर सेवेत मुदतवाढ देणे/पुनर्नियुक्ती देणे यावर पूर्णतः बंदी राहील.

2. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. जे कर्मचारी पूर्वीच्या नियमानुसार यापूर्वीच सेवानिवृत्त झालेले आहेत किंवा जे कर्मचारी हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकाला सेवेत मुदवाढ दिलेली असल्यामुळे/पुनर्नियुक्ती दिल्यामुळे सेवेत आहेत किंवा ज्यांना विनिर्दिष्ट नियम आणि/किंवा विनियम लागू आहेत, असे कर्मचारी वगळून, सर्व राज्य शासकीय कर्मचा–यांना हे आदेश लागू ठरतील.

3. सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षांवरुन 60 वर्षापर्यन्त वाढविण्याच्या परिणामी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये यांना विनंती करण्यात येते की, सरळ नियुक्त्या तसेच पदोन्नत्यांच्या संदर्भात सेवानिवृत्तिमुळे रिक्त होणा–या पदांचे, पुनर्विलोकन करण्यात यावे, जेणेकरुन आवश्यकतेपेक्षा अधिक नियुक्त्या होणार नाहीत किंवा अधिसंख्य पदांच्या निर्मितीस कारणीभूत ठरणारे न्यायालयीन दावे दाखल केले जाणार नाहीत किंवा सेवानिवृत्तिमुळे रिक्त झालेल्या पदांच्या संख्येत घट झाल्याच्या परिणामी विचार–क्षेत्रात बदल झाल्यामुळे विभागीय पदोन्नती समित्यांमार्फत पुनर्विलोकन करावे लागणार नाही.

4. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 (सन 1962 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम 248 च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहेत की, वरील निर्णय, जिल्हा परिषदांमधील ज्या कर्मचा–यांचे सध्याचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षे आहे, अशा कर्मचा–यांनाही लागू राहील

5. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतनाची योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील ज्या कर्मचा–यांचे सध्याचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षे आहे, अशा कर्मचा-यांनाही, वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

6. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदींमध्ये, या शासन निर्णयाच्या तरतुदींपुरती सुधारणा करण्यात आली आहे, असे मानण्यात यावे. या नियमात रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

7. या शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पी. सुब्रम्हण्यम,
शासनाचे मुख्य सचिव.

म.शा.मु., सेवा मुद्र.–306(16000+40–5–98)–1

प्रति,

भारत सरकारचे सचिव, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),

महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),

महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),

मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),

नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),

संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५२० प्रती),

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),

उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),

वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),

राज्यपालांचे सचिव,

मुख्य मंत्र्यांचे सचिव,

उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,

सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,

*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

मंत्रालयातील सर्व विभाग,

विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,

मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),

तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),

संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),

सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,

सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),

सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),

सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),

कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),

कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),

कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),

कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती)

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),

शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

वित्त विभागातील सर्व कार्यासने,

निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

Raising the age of retirement from 58 years to 60 years.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
FINANCE DEPARTMENT
Resolution No.PEN-1098/CR-45/SER-4,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 29th May 1998.

## RESOLUTION

In pursuance of Government of India's decision on the recommendations of the Fifth Central Pay Commission, Government is pleased to direct that :-

(a) Except as otherwise provided specifically, every Government servant whose age of retirement is currently 58 years shall now retire from service on the afternoon of the last day of the month in which he/she attains the age of sixty years. However, Government servant whose date of birth is the first of a month shall retire from service on the afternoon of the last day of the preceeding month on attaining the age of sixty years.

(b) There shall be complete ban on extension/re-employment in service beyond the age of superannuation.

2. These orders will come into force with effect from the date of issue and will be applicable to all State Government employees except those who have already retired in accordance with the earlier rules or those who are on extension/re-employment in service on the date of issue of these orders or those who are governed by specific rules and/ or regulations.

3. Consequent upon enhancement of the age of retirement from 58 years to 60 years all administrative departments of the Mantralaya and the offices thereunder are requested to review the vacancies arising from retirement in regard to direct recruitment as well as promotion so that there is no over recruitment or litigation leading to creation on supernumerary posts or review DCPs because of change in the zone of consideration as a result or reduction in the number of retirement vacancies.

4. In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samities Act, 1961 (Maharashtra V of 1962) and of all other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decision shall also apply to those Zilla Parishad employees, whose age of retirement is currently 58 years.

5. Government is also pleased to direct that above decisions should mutatis mutandis, apply to those employees, whose age of retirement is currently 58 years, of recognised and aided educational institutions, non-agricultural universities and affiliated non-Government colleges and agricultural universities to whom the pension scheme is made applicable.

6. The existing provisions of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 in this respect should be deemed to have been amended to the extent of the provisions of this Resolution. A formal amendment to these Rules will be made in due course.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P.SUBRAHMANYAM,
Chief Secretary to Government

------